**नियमित दिवाणी दावा क्र.८११/१९९९**

दिगंबर वि.सोनबा

**निशाणी क्र.७4 खालील आदेश**

प्रतिवादी क्र.६ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्याच्याविरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द होवून त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यासाठी दिलेला आहे.

प्रतिवादींचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला असून ते त्यांच्या घरगुती अडचणींमुळे समन्सची बजावणी होवूनही हजर राहिले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फाचा आदेश झालेला आहे. दावा गुणवत्तेवर चालून न्यायनिर्णय होणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द होवून त्यांची कैफीयत स्वीकारणे गरजेचे आहे व शेवटी त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. वादींनी त्यांचे म्हणणे अर्जाच्या मलपृष्ठावर दाखल केले व प्रस्तुतचा अर्ज कायदयाच्या नजरेत चालणारा नसून तो रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

४. अर्ज वाचला, त्यावरील वादीचे म्हणणे अवलोकीले, अभिलेख पाहिला. समन्सची बजावणी होवूनही प्रतिवादी हजर झाले नाहीत म्हणून त्यांचेविरुध्द एकतर्फाचा आदेश झालेला आहे. अर्जात दिलेले कारण संयुक्तीक वाटत नाही. तथापि, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींना संधी देणे गरजेचे वाटते. सबब, नैसर्गीक न्यायतत्तवानुसार प्रतिवादींवर आर्थिक दंडात्मक कारवाई करुन अर्ज मंजूर केल्यास ते न्यायोचीत होईल. सबब, आदेश.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी वादींना रु.२५०/– दंड देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

माळशिरस
दिनांक – १६.०७.२०१८

(आर.एस.क्षीरसागर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
माळशिरस

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : **S.S.Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Judgment signed by P.O. on : **16.07.2018.**

(d) Judgment uploaded on : **17.07.2018.**